नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ४ Issue - 4 | वार बुधवार दि. २१ मे २०२५ Blow- Wednesday Date 21 May 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# ‘माझे घर, माझा अधिकार’ राज्याचे गृहनिर्माण धोरण

## शाश्वत, सुरक्षित आणि पर्यावरणास अनुकूल घराचे अभिवचन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई (प्रतिनिधी) : राज्याच्या गृहनिर्माण धोरण २०२५ ला आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. ‘माझे घर, माझा अधिकार’ हे ब्रीद अनुसरून वर्ष २०३० पर्यंत राज्यातील प्रत्येक नागरिकाला शाश्वत, सुरक्षित आणि पर्यावरणास अनुकूल घराचे अभिवचन देणाऱ्या राज्याच्या गृह निर्माण धोरणास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या धोरणात डाटा आधारित निर्णय प्रक्रिया, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, गतिमानता व पारदर्शकता आणि सामाजिक समावेशकता यावर भर दिला आहे.



गृहनिर्माण धोरणाची प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे :-

दोन दशकांनंतरचे धोरणः राज्याचे यापूर्वीचे गृहनिर्माण धोरण सन २००७ मध्ये प्रसिद्ध झाले होते. त्यानंतर सुमारे १८ वर्षांनी गृहनिर्माण धोरण जाहीर झाले आहे.

गृहनिर्माण धोरणाची चार मूलतत्त्वेः आर्थिक, सामाजिक, पर्यावरणीय आणि आपत्तीशी संबंधित आव्हानांची पूर्तता करण्यासाठी घरे. परवडणारी, सर्वसमावेशक, शाश्वत आणि पुनर्माणशील अशा चार मार्गदर्शक तत्त्वांभोवती या धोरणाची रचना करण्यात आली आहे.

सामाजिक समावेशनः या धोरणात ज्येष्ठ नागरिक, नोकरदार महिला, विद्यार्थी आणि औद्योगिक कामगारांसाठी विशेष उपाययोजना प्रस्तावित केल्या आहेत. यामध्ये नोकरदार महिला, विद्यार्थी यांना भाडेतत्त्वावर आणि

### २०३० पर्यंत ३५ लाख घरांच्या निर्मितीचे उद्दिष्ट

औद्योगिक कामगारांसाठी १० वर्षांपर्यंत भाडेतत्त्वावर त्यानंतर मालकी हक्काने घरे दिली जातील. सार्वजनिक-खाजगी भागीदारीद्वारे विकासक आणि प्रचालकासाठी प्रोत्साहन दिले जाईल. सामाजिक गृहनिर्माणाकरिता सी.एस.आर. निधीचा वापर केला जाईल. याकरिता प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

राज्यात २०३० पर्यंत ३५ लाख घरांचे उद्दिष्टः राज्याने सन २०३० पर्यंत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी सामाजिक गृहनिर्माण (एमआयजी) आणि अल्प उत्पन्न गट (एलआयजी) करिता ३५ लाख घरे बांधण्याचे उद्दिष्टे ठेवली आहेत. याकरिता ७० हजार कोटींची गुंतवणूक अपेक्षित आहे. तसेच त्यापुढील १० वर्षात ५० लाख घरांच्या निर्मितीचे उद्दिष्ट आहे.

घरांची गरज व मागणी सर्वेक्षण विश्लेषणः सन २०२६ पर्यंत सर्व जिल्ह्यांमध्ये निवासी सदनिकांची आवश्यकता आणि मागणीचे सर्वेक्षण व विश्लेषण करून यापुढे योजनांची आखणी / अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

राज्य (पान २ वर..)

# कल्याणमधील इमारतीचा स्लॅब कोसळल्याने जीवितहानी; सहा जणांचा मृत्यू, ६ जखमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे (जिमाका):- कल्याण शहरातील कल्याण (पूर्व) चिकणीपाडा येथील सप्तशृंगी कॉपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी या पाच मजली निवासी इमारतीमधील चौथ्या मजल्यावर फरशी बसविण्याचे काम सुरू होते. हे काम सुरू असताना चौथ्या मजल्याचा स्लॅब खाली कोसळला आणि ही दुर्घटना घडली. या दुर्घटनेत एकूण ६ व्यक्ती जखमी झाल्या असून ६ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे, अशी माहिती तहसिलदार सचिन शेजाळ यांनी दिली आहे.




तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय, कल्याण यांनी दिलेल्या अहवालानुसार, ही घटना दि. २० मे २०२५ रोजी दुपारी २.०० वाजताच्या सुमारास घडली. ही दुर्घटना घडल्यानंतर जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष अशोक शिनगारे, निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.संदीप माने यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक प्रशासनाने तात्काळ मदत व बचाव कार्य सुरू केले.

त्याचबरोबर घटनेनंतर प्रशासनाकडून तातडीने पंचनामा करण्यात आला असून, जखमींना जवळील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, तर मृतांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले आहेत. घटनास्थळावरील शोध कार्य पूर्ण झाले असून इमारतीतील नागरिकांना जवळील ज्ञानमंदिर विद्यालय, कल्याण (पूर्व) येथे स्थलांतरित करण्यात आले आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे त्या सर्वांची राहण्याची व जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे.

### मुख्यमंत्र्यांकडून मृतांना श्रद्धांजली तर नातेवाईकांना रु. ५ लाख अर्थसहाय्याची घोषणा

या घटनेची माहिती मिळाल्याबरोबर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दुर्घटनेतील मृत सहा नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी असल्याचे सांगितले. तसेच मृतांच्या कुटुंबियांना शासनातर्फे प्रत्येकी पाच लाखांचे अर्थसहाय्य देण्याची घोषणाही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी केली आहे.

# माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांचा मंत्रिमंडळात समावेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन चंद्रभागा चंद्रकांत भुजबळ यांना राज्याच्या मंत्रीपदाची शपथ दिली.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत राजभवन मुंबई येथे झालेल्या एका छोटेखानी शपथविधी समारंभात राज्यपालांनी भुजबळ यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली.

यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, जलसंपदा (गोदावरी आणि कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे -पाटील, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, उद्योग ,मराठी भाषा मंत्री उदय सामंत, आदिवासी विकास मंत्री अशोक वुईके, इतर मागास बहुजन कल्याण, दुग्ध व्यवसाय विकास विभाग मंत्री अतुल सावे, क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, कौशल्य विकास, रोजगार उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, खासदार प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, राज्यपाल यांचे सचिव प्रशांत नारनवरे, तसेच मंत्री छगन भुजबळ यांचे कुटुंबिय यावेळी उपस्थित होते. सुरुवातीला मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी शपथविधी सो ह ळ या सा ठी राज्यपालांची अनुमती मागितली. त्यानंतर राज्यपालांनी छगन भुजबळ यांना शपथ दिली. शपथविधी नंतर राज्यपालांनी मंत्री भुजबळ यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

### राज्यपालांकडून पद व गोपनीयतेची शपथ

# महाराष्ट्रात पावसाचा हाहाकार; कोकणात, पुण्यातही थैमान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये मान्सूनपूर्व पावसाने थैमान घातल्याचं बघायला मिळत आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाचा उद्रेक बघायला मिळतोय. विशेष म्हणजे मान्सून पूर्व आलेल्या अवकाळी पावसाचा कोकण रेल्वेला मोठा फटका बसला आहे. कोकण रेल्वे मार्गावर वेरवली विलवडे स्टेशन दरम्यान दरड कोसळली आहे. त्यामुळे कोकण रेल्वेच्या वाहतुकीवर परिणाम झाला. मंगळवारी संध्याकाळच्या सुमारास ही घटना घडली आहे. या घटनेमुळे रेल्वे गाड्या ठिकठिकाणी थांबून ठेवण्यात आल्या. दरड कोसळल्यानंतर कोकण रेल्वे प्रशासनाकडून दरड हटविण्याचं काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले. त्या भागात खूप पाऊस सुरु होता. त्यामुळे दरड हटवायला विलंब झाला. वंदे भारत एक्सप्रेस गेल्यानंतर ही दरड कोसळली. त्यामुळे वंदे भारत नंतर काही वेळाच्या अंतराने पाठोपाठच असणाऱ्या जनशताब्दी आणि तेजस एक्सप्रेस या थांबवून ठेवण्यात आल्या आहेत.



कोकण रेल्वे प्रशासनाकडून दरड हटवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू होते. त्यामुळे काही वेळाने या मार्गावरील वाहतूक सुरू होईल असे सांगितले जात होते. अखेर ही वाहतूक आता सुरु झाली आहे. त्या मार्गावर दगड आल्याने नेत्रावती एक्सप्रेस थांबवून ठेवण्यात आली होती. तर तेजस एक्सप्रेस आणि जनशताब्दी एक्सप्रेस या अति पावसामुळे दृश्य मानता कमी झाल्यामुळे थांबवून ठेवण्यात आल्या होत्या, अशी माहिती कोकण रेल्वे प्रशासनातील उच्चपदस्थ सूत्रांनी दिली आहे. पुण्यात देखील आज पावसाने थैमान घातलं. पुण्यात वादळी वाऱ्यासह आलेल्या पावसामुळे सर्वसामान्य नागरिकांचे प्रचंड हाल झाले. वादळी वाऱ्यामुळे फुरसुंगी येथे पार्किंगच्या गाड्यांवरील पत्र्याचे छप्प उडताना दिसले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. एवढंच नाही तर वाघोलीजवळील सणसवाडी परिसरात एक मोठे होर्डिंग जमिनीवर कोसळलं. पण सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही हानी झाली नाही. पुण्यात एकूण तीन ठिकाणी होर्डिंग कोसळल्याची घटना घडली. पुण्यात कालदेखील मुसळधार पाऊस पडला होता. त्यानंतर आजदेखील पुण्यात मान्सपूर्व आलेल्या पावसाने जनजीवन विस्कळीत केलं. पुण्यात स्वारगेट, कोथरुड, कर्वेनगर, शिवाजीनगर, कात्रज या ठिकाणी जोरदाप पाऊस सुरु आहे. वादळी वारे आणि मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी वीज पुरवठा खंडीत झाला आहे. तसेच शहरात १५ झाडे कोसळल्याची देखील माहिती आहे. मुंबईतदेखील आज संध्याकाळी मुसळधार पाऊस पडला. पाऊस इतका पडला की या भागातील अंधेरी सब-वे बंद करण्यात आला. तसेच पावसामुळे मोठी वाहतूक कोंडी झाली. संध्याकाळनंतर मुंबईत विजांच्या कडकडाट आणि ढगांच्या गडगडाटासह पाऊस पडला. या पावसामुळे घरी निघालेल्या चाकरमान्यांचे प्रचंड हाल झाले.

## महावितरणाच्या शिरवळ उपकेंद्र हद्दीतील पिन इन्शुलेटर फुटल्याने वीज पुरवठा खंडित

## विजेचा बिघाड शोधमोहीम रात्री १ वाजले तरीही सुरूच

# अक्कलकोट तालुक्याला अवकाळी पावसाचा तडाखा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : तालुक्याला वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने मंगळवारी सायंकाळी तुफानी पावसाने झोडपले, यात अक्षरशः अनेक ठिकाणी काहींचे घरावरील पत्रे उडाली तर काही ठिकाणी जानावऱ्यांच्या चाऱ्याचीही मोठ्या प्रमाणात नासधूस झाली. याच वादळी वाऱ्या मध्ये अक्कलकोट तालुका महावितरण शिरवळ उपकेंद्रा अंतर्गत येणाऱ्या आसपास च्या गावातील विजेच्या खंबावरील पिन इन्सुलेटर फुटल्याने सायंकाळी पासून विजेची बत्ती गुल झाली असून, या अवकाळी चा फटका महावितरणाला मोठ्या प्रमाणात बसला आहे.

### महावितरणाचे अधिकारी, कर्मचारी यांचे दुरुस्ती चे काम युद्धपातळीवर सुरु

या अवकाळी मध्ये विजेच्या खंबावरील पिन इन्सुलेटर फुटल्याने शिरवळ उपकेंद्र अंतर्गत येणाऱ्या २० गावे अंधारात बुडाली असून, या गावांतील वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरण चे उपकार्यकारी अभियंता राजू आडम साहेब, सहाय्यक अभियंता संपत यमगर साहेब, हे आपल्या संपूर्ण टीम सह फिल्डवर रात्रभर पेट्रोलिंग करत विजपुरवठा सुरळीत करण्यासाठी जीवाची पराकाष्ठा करत असल्याचे विदारक चित्र पाहवयास मिळत आहे.



महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी बिघाड शोधून दुरुस्तीची कामे वारा व पाऊस कमी होताच तात्काळ सुरू केली असून, जवळपास २२ ते २५ ठिकाणी पिन इन्सुलेटर फुटून वीज पुरवठा खंडित झाल्याने पिन इन्सुलेटर दुरुस्तीची कामे व दुसऱ्या उपकेंद्रातून व दुसऱ्या फिडरवरुन वीजपुरवठा सुरळीत करता येईल का..? जेणेकरून रात्रभर वीजपुरवठा बंद झाल्याने नागरिकांचे हाल होऊ नये याचीच काळजी घेत महावितरण चे सर्व लाईनमन रात्रभर अंधारात काम करून वीज पुरवठा सुरळीत करण्याच्या प्रयत्नात असताना दिसत आहेत.

हा वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी उपकार्यकारी अभियंताअक्कलकोट-१-.राजूआडम साहेब, सहाय्यक अभियंता-शेख साहेब, संपत यमगर साहेब, कांबळे साहेब, तसेच वरिष्ठ तंत्रज्ञ-कमलेश जाधव, अमित जाधव, बिलाल चाऊस, गूरूशांत वमने, भिमा ऊम राणे, संतोष जिंतूरकर, राजशेखर विभूते, बाह्यस्रोत कर्मचारी-बसू स्वामी, महावितरण वाहन चालक हारून जमादार यांच्या सह अन्य कर्मचारी व अधिकारीवर्ग उपस्थित होते.

### पिन इन्सुलेटर फुटल्याने वीजपुरवठा आहे अनेक तासापासून खंडित; शेतीचा वीजपुरवठाही बंद

**मंगळवारी सायंकाळी पासून, महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी दुरुस्तीची कामे सुरु केली असून, आतापर्यंत १५ ठिकाणचे पिन इन्सुलेटर बदलून झाले असून, अद्याप काही ठिकाणचे पिन इन्सुलेटर बदलण्याचे काम युद्धपातळीवर सुरु असून, त्यावरील शेतीचा वीजपुरवठा देखील मंगळवारी रात्रीपर्यंत बंद असून, त्यांच्या दुरुस्तीची कामे सुरू असून तातडीने वीजपुरवठा सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे महावितरणच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.**

### काही ठिकाणी शेतीचा वीजपुरवठा खंडित झाला आहे

**मंगळवारी सायंकाळी वाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणात विजेचे पिन इन्शुलेटर फुटल्याने अनेक गावांतील वीजपुरवठा खंडित झाला आहे. हे पिन इन्सुलेट बदलण्याचे काम सध्या युद्धपातळीवर सुरु आहे. काही ठिकाणी शेतीचा वीजपुरवठा खंडित झाला आहे. तेही ट्रान्सफॉर्मर्स सुरू करून तातडीने शेतीचा वीजपुरवठा पूर्ववत केला जाईल.**

**– राजू आडम , उपकार्यकारी अभियंता महावितरण, अक्कलकोट उपविभाग**

## संपादकीय....

# कृत्रिम रंगावर बंदी

भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने (एफएसएसएआय) सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना अवैधपणे फळांवर कृत्रिम रंगांचा वापर रोखण्यासाठी तपासणी आणि विशेष मोहीम राबवण्याचे आवाहन केले आहे. यासह फळांच्या कृत्रिम पिकवण्यासाठी कॅल्शियम कार्बाइडच्या वापरावर बंदी आणून ग्राहकांच्या आरोग्याचे होणारे नुकसान थांबवून सकारात्मक पाऊल उचलले आहे. सर्व राज्य, केंद्रशासित प्रदेशांच्या अन्न सुरक्षा आयुक्त आणि 'एफएसएसएआय'च्या प्रादेशिक संचालकांना फळांच्या बाजारपेठा आणि मंडईंवर कडक लक्ष ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहे, जेणेकरून कॅल्शियम कार्बाइडसारख्या (ज्याला सामान्यतः 'मसाला' म्हणतात) पिकवणाऱ्या एजंट्सचा अवैध वापर रा-खता येईल. या मोहिमेचा भाग म्हणून, ज्या ठिकाणी फळांची साठवणूक केली जाते तिथे जर कॅल्शियम कार्बाइडचा वापर आढळला तर त्याला परिस्थितीजन्य पुरावा मानून अन्न व्यवसाय ऑपरेटर (एफबीओ) वर खाद्य सुरक्षा आणि मानके (एफएसएस) कायदा, २००६ अंतर्गत कारवाई केली जाणार आहे. फळांच्या कृत्रिम पिकवणीसाठी कॅल्शियम कार्बाइडचा वापर खाद्य सुरक्षा आणि मानके (विक्रीवरील प्रतिबंध आणि निर्बंध) नियम, २०११ अंतर्गत कडकपणे प्रतिबंधित आहे. या पदार्थाचा वापर गंभीर आरोग्य धोके निर्माण करतो आणि यामुळे तोंडाला जखम, पोटात जळजळ आणि कर्करोगजन्य गुणधर्म निर्माण होऊ शकतात. याशिवाय, एफएसएसएआयने असेही निर्देश दिले आहेत की, ज्या एफबीओज् कृत्रिमरित्या केळी पिकवताना रसायनांचा वापर करतात, त्यांच्यावरही कारवाई केली जावी. यात फळांना कृत्रिमरित्या पिकवण्यासाठी इथिलीन गॅसचा वापर कसा करावा याबाबत मानक संचालन प्रक्रिया (एसओपी) स्पष्टपणे नमूद केली आहे.

# मौजे सुकेनेत विज कोसळून शेतकरी ठार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
निफाड/प्रतिनिधी

मौजे सुकेने येथील शेतात काम करत असताना वीज कोसळून दीपक रंगनाथ रहाणे वय ३८ या तरुण शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे, राहणे हे नेहमीप्रमाणे आपल्या शेतात शेती काम करत असताना अचानक आकाशात वादळाची चिन्ह दिसू लागली आणि काही क्षणातच जोरदार वीज कोसळली विज-थेट त्यांच्या अंगावर पडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

त्यांच्या पश्चात पत्नी व एक मुलगा असा परिवार आहे तहसीलदार नाईकवाडे यांनी तात्काळ दखल घेत निफाड



ग्रामीण रुग्णालयात स्वतः उप-स्थित राहून शव विच्छेदनासाठी आवश्यक त्या सर्व सोयी उप-लब्ध करून देण्याचे आदेश दिले आहेत, त्यांच्या कुटुंबियांना शासनाने तात्काळ आर्थिक मदत द्यावी अशी गावकरी मागणी करत आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास ओझर पोलीस ठाण्याचे अधिकारी करत आहे

# राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णयांचा धडाका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**वाशिम जिल्ह्यातील कारंजा येथे वरिष्ठस्तर दिवाणी न्यायालय**

वाशिम जिल्ह्यातील कारंजा येथे दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) स्थापन करणे, त्यासाठीची आवश्यक पदे उप-लब्ध करून देणे आणि येणाऱ्या खर्चास आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

वाशिम जिल्ह्यातील कारंजा येथे दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) स्थ-ापन करण्यासाठीचा प्रस्ताव उच्च न्यायालयाकडून शासनास सादर करण्यात आला होता. या प्रस्तावास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या न्यायालयाकरिता २३ नियमित पदे आणि बाह्य यंत्रणेद्वारे पाच पदांच्या सेवा उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली. यापोटी येणाऱ्या एकूण रूपये १,७६,४२,८१६/- इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली. या न्यायालयासाठी दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर)-एक, अधीक्षक-एक, सहायक अधीक्षक-दोन, लघुलेखक श्रेणी-२ -एक, वरिष्ठ लिपिक-तीन, कनिष्ठ लिपिक-नऊ, बेलीफ-तीन, शिपाई-तीन, पहारेकरी-एक, सफाईगार-एक अशा पदांना मान्यता देण्यात आली.

**महानगर गॅस लिमिटेड कंपनीला बायोमेथेनेशन प्रकल्पासाठी देवनार येथील भूखंड**

महानगर गॅस लिमिटेड कंपनीला देवनार येथील भूखंड सवलतीच्या दरात देण्यास आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

केंद्र सरकारचे गोबरधन योजनेअंतर्गत शहरी भागात ७५ बायोमेथेनेशन प्रकल्पासह ५०० नवीन बायोगॅस प्रकल्प उभारण्याचे उद्दिष्ट आहे. या प्रकल्पाच्या उभारणीसाठी येणारा खर्च तेल आणि वायू विपणन संस्था करणार आहे. मात्र या प्रकल्पांसाठी राज्यांकडून नाममात्र दरात जमीन आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा केंद्र सरकारच्या सूचना आहेत. त्यानुसार महानगर गॅस लिमिटेड कंपनीला देवनार येथील १८ एकर जमीन २५ वर्षांसाठी भाडेपट्टयाने उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात आली. या जागेवर बायोमिथेशन तंत्राचा वापर करून दर दिवशी ५०० टन क्षमतेचा कॉम्प्रेस्ड बायोगॅस उभारणी करण्यात येईल. या जमिनीसाठी प्रतिवर्षी ७२,८४३ रूपये भाडेपट्टा शुल्क आकारण्यात येईल. यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका आणि महानगर गॅस लिमिटेड कंपनी यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात येणार आहे.

**एक लाख कोटी रूपयांच्या गुंतवणूकीसह, एक लाख रोजगार संधी आणणाऱ्या प्रकल्पांना मान्यता**

उद्योग विभागातील धोरण कालावधी संपुष्टात आल्यामुळे प्रलंबित असलेल्या ३२५ प्रस्तावांना आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या प्रस्तावांना मंजुरी दिल्यामुळे १,००,६५५.९६ कोटी रूपयांची गुंतवणूक आणि ९३,३१७ रोजगार निर्मिती होणे अपेक्षित आहे.

उद्योग विभागाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स धोरण २०१६ आणि त्याअंतर्गत फॅब प्रकल्पाकरिता प्रोत्साहने, महाराष्ट्राचे अवकाश व संरक्षण क्षेत्र उत्पादन धोरण २०१८, रेडिमेड गारमेंट निर्मिती, जेम्स ण्ड ज्वेलरी, सूक्ष्म इलेक्ट्रॉनिक्स व अभियांत्रिकी घटक याकरिता फ्लॅटेड गाळायुक्त औद्योगिक संकुले धोरण २०१८, महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक धोरण २०१९ या धोरणांचा कालावधी संपुष्टात आलेला आहे. सदर विषयांचे नवीन धोरण ठरविण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे. मात्र धोरणा-चा कालावधी संपुष्टात आल्यानंतर प्राप्त झालेल्या विविध घटकांच्या प्रस्तावापैकी राज्याच्या विकासाच्या दृष्टीने फायदेशीर ठरतील अशा घटकांना प्रोत्साहने मंजूर करण्यास वित्त विभागाने मान्यता दिली आहे. वरील धोरणांचा कालावधी संपुष्टात आल्यामुळे नवीन धोरण लागू होईपर्यंत संबंधित धोरणानुसार प्रलंबित प्रस्तावांना मान्यता दिल्यास उद्योग घटकांना गुंतवणूक करणे, उद्योग घटकांना अनुदान देणे शक्य होणार आहे. यान-ुसार महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स धोरण २०१६ आणि त्याअंतर्गत फॅब प्रकल्पाकरिता प्रोत्साहने धोरणाच्या अधीन राहून ३१३ प्रलंबित प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. ३१३ प्रस्तावांमधून ४२,९२५.९६ कोटी रूपयांची गुंतवणूक अपेक्षित असून ४३,२४२ रोजगार निर्मिती होणार आहे.

महाराष्ट्राचे अवकाश व संरक्षण क्षेत्र उत्पादन धोरण २०१८ नुसार एकूण १० प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. या १० प्रस्तावांमधून ५६,७३० कोटी रूपयांची गुंतवणूक अपेक्षित असून १५,०७५ रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. तर रेडिमेड गारमेंट निर्मिती, जेम्स ण्ड ज्वे-लरी, सूक्ष्म इलेक्ट्रॉनिक्स व अभियांत्रिकी घटक याकरिता फ्लॅटेड गाळायुक्त औद्योगिक संकुले धोरण २०१८ अन-ुसार २ प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. या प्रस्तावांमधून १००० कोटी रूपयांची गुंतवणूक अपेक्षित असून ३५,००० रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.




**सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन योजनेसाठी ५ हजार ३२९ कोटींची मान्यता**

धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा तालुक्यातील सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन योजनेस ५३२९.४६ कोटी रुपयांच्या द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यतेस आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा तालुक्यातील सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन योजनेमुळे शिंदखेडा आणि धुळे तालुक्यातील एकूण ३६४०७ हे.क्षेत्र सिंचित होणार असून ५२७२० हे. सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. हा प्रकल्प केंद्र सरकारच्या विशेष पॅकेजमध्ये बळीर-ाजा जलसंजीवनी योजनेअंतर्गत समावेश करण्यात आला आहे. या प्रकल्पावर मार्च २०२५ अखेर २४०७.६७ कोटी खर्च झाला आहे. आज द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यतेनुसार ५३२९.४६ कोटी रूपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. या प्रकल्पाचे काम नियोजित वेळेत पूर्ण करावयाचे आहे. प्रकल्पाचे काम करताना राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या अहवालातील सर्व मुद्यांची पूर्तता करण्यात येणार आहे.

प्रकल्पाच्या कोणत्याही प्रयोजनार्थ मंजूर प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेबाहेर जाऊन निधी वितरण अथवा अतिरिक्त खर्च न करण्याची जबाबदारी महामंडळाची राहील. प्रकल्पाचे वाढीव लाभक्षेत्र ३०४० हे.अधिसूचित करण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे. प्रकल्पास आवश्यक वैधानिक आणि तांत्रिक मान्यता घेण्याची जबाबदारी महामंडळाची राहील. प्रकल्प पूर्णत्वाच्या संभाव्य नियोजनानुसार तरतूद उपलब्ध करण्याची संपूर्ण जबाबदारी महामंडळाची राहील, अशा अटींच्या अधीन राहून ही मान्यता देण्यात आली आहे.

**सिंधुदुर्गमधील अरुणा प्रकल्पांतर्गत मौजे हेत जल सिंचन प्रकल्पास २ हजार २५ कोटी**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वैभववाडी तालुक्यातील मौजे हेत जल सिंचन प्रकल्पास २०२५.६४ कोटी रुपयांच्या चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यतेस आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वैभववाडी तालुक्यातील मौजे हेत जल सिंचन प्रकल्पामुळे वैभववाडी तालुक्यातील ४४७५ हेक्टर आणि रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यामध्ये ८३५ हेक्टर असे एकूण ५३१० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. प्रकल्पासाठी आवश्यक अस-लेले भूसंपादन करून पुनर्वसनाबाबत प्राधान्याने कार्यवाही करणे आवश्यक आहे. हे भूसंपादन करताना भविष्यात न्यायालयीन प्रकरणे उद्भवणार नाहीत, याबाबत योग्य ती खबरदारी घेण्यात येणार आहे. प्रकल्पासाठी आवश्यक वैधानिक आणि तांत्रिक मान्यता सक्षम स्तरावर घेणे यांसह विविध अटींच्या अधीन राहून सदर प्रकल्पास २०२५.६४ कोटी रूपयांच्या चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यतेस मंजुरी देण्यात आली.

**रायगडमधील पोशीर प्रकल्पास ६ हजार ३९४ कोटी**

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील पोशीर प्रकल्पास ६३९४.१३ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकाच्या प्रशासकीय मान्यतेस आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील मौजे कुरूंग गावाज-वळ पोशीर नदीवर १२.३४४ टी.एम.सी.चे धरण बांधणे प्रस्तावित आहे. प्रकल्पातील उपयुक्त पाणीसाठा ९.७२१ टी.एम.सी.आहे. त्यापैकी पिण्यासाठी ७.९३३ टी.एम.सी. आणि औद्योगिक वापरासाठी १.८५९ टी.एम.सी. पाणी वापर प्रस्तावित आहे. या प्रकल्पाचे पाणी मुंबई महानगर, नवी मुंबई, उल्हास-नगर, अंबरनाथ, बदलापूर आदी शहरांना पिण्याच्या पाण्याकरिता पुरविले जाणार आहे. त्यामुळे पाणी वापर आधारित लाभधारक संस्थांची भांडवली खर्चातील हिस्सेदारी निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण (३३.९६ टक्के, २१७१.४५ कोटी रूपये), नवी मुंबई महानगरपालिका (४३.५३ टक्के, २७८३.३७ कोटी रूपये), उल्हासनगर महानगरपालिका (९.५६ टक्के, ६११.२८ कोटी रूपये), अंबरनाथ नगर परिषद (७.०७ टक्के, ४५२.०६ कोटी रूपये), बदलापूर नगर परिषद (५.८८ टक्के, ३७५.९७ कोटी रूपये) या संस्थांना खर्चातील हिस्सेद-ारी निश्चित करून देण्यात आली आहे. हा प्रकल्प कोकण पाटबंधारे विकास महामंडळाद्वारे ठेव तत्त्वावर उभारण्यात येणार आहे. हा प्रकल्प राबविण्याकरिता कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण, नवी मुंबई महानगरपालिका, उल्हास-नगर महानगरपालिका, अंबरनाथ नगर परिषद, बदलापूर नगर परिषद यांच्यात एक सामंजस्य करार करण्यात येणार आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाचे म हानगर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती स्थापन करण्यात येणार आहे. या समितीत लाभदायक स्थानिक स्वराज्य संस्था आणि कोकण पाटबंधारे विकास महामंडळाच्या प्रतिनिधींचा सम ावेश असेल.

**रायगडमधील शिलार प्रकल्पासाठी ४ हजार ८६९ कोटी**

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील मौजे शिलार प्रकल्पास प्रशासकीय मान्यतेस आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील मौजे शिलार प्रकल्पांतर्गत मौजे किकवी येथे सिल्लार नदीवर ६.६१ टी.एम.सी. क्षमतेचे धरण बांधणे प्रस्तावित आहे. या योजनेस ४८६९.७२ कोटी रूपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या प्रकल्पाचे पाणी मुंबई महानगर, पनवेल महानगरपालिका आणि नवी मुंबई महानगरपालिका आदी शहरांना पिण्याच्या पाण्याकरिता पुरविले जाणार आहे. त्यामुळे पाणी वापर आधारित लाभधारक संस्थांची भांडवली खर्चातील हिस्सेदारी निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण (भांडवली खर्चातील हिस्सेद-ारी टक्केवारी १५.०८, रक्कम ७३४.३५ रूपये कोटीत), पनवेल महानगरपालिका (भांडवली खर्चातील हिस्सेदारी टक्केवारी ७५.४२, रक्कम ३६७२.७५ रूपये कोटीत), नवी मुंबई महानगरपालिका (भांडवली खर्चातील हिस्सेदारी टक्केवारी ९.५, रक्कम ४६२.६२ रूपये कोटीत) या संस्थांना खर्चातील हिस्सेदारी निश्चित करून देण्यात आली आहे. हा प्रकल्प कोकण पाटबंधारे विकास महामंडळद्वारे ठेव तत्त्वावर उभारण्यात येणार आहे. सदर प्रकल्प राबविण्याकरिता कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, मुंबई म हानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नवी म ुंबई व पनवेल महानगरपालिका यांच्यात एक सामंजस्य करार करण्यात येणार आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाचे म हानगर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती स्थापन करण्यात येणार आहे. या समितीत लाभदायक स्थानिक स्वराज्य संस्था आणि कोकण पाटबंधारे विकास महामंडळाच्या प्रतिनिधींचा सम ावेश असेल.

# 'माझे घर, माझा अधिकार' राज्याचे गृहनिर्माण धोरण

(पान १ वरून..) गृहनिर्माण माहिती पोर्टल (स्टेट हाऊसिंग इन्फार्मेशन पोर्टल): डाटा आधारित निर्णय प्रक्रियेकरिता राज्य गृहनिर्माण माहिती पोर्टल (डक्खझ) केंद्रीकृत डिजिटल प्लॅटफॉर्म म्हणून निर्माण करण्याची कार्यवाही करण्यात येणार. या पोर्टलवर घरांची मागणी आणि पुरवठासंदर्भात विदा मागोवा, सदानिकांचे जिओ-टॅगिंग, निधी वितरण, जिल्हानिहाय भूमी अधिकोष आणि महारेरा, महाभूलेख आणि पी.एम.गती शक्तीसारख्या प्रणा-लीशी एकरूपता तसेच पारदर्शकता आणि समन्वयाकरिता विश्लेषण, पूर्वानुमान आणि अद्ययावतीकरणासाठी कृत्रिम बुध्दिमत्ता साधने वापरुन निर्णय घेण्यास मदत करेल. गृहनिर्माणाच्या सर्व योजना महाराष्ट्र युनिफाईड सिटिझन डेटा हब पोर्टलशी संलग्न राहतील.

निवासी वापरासाठी योग्य असलेल्या शासकीय जमिनींची भूमी अधिकोष आधारसामग्रीची निर्मितीः महसूल व वन विभाग, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, क्षेत्रीय नियोजन प्राधिकरण, जलसंपदा विभाग इ.च्या समन्वयाने २०२६ पर्यंत राज्यव्यापी विकसित करण्यात येणार आहे. सदर माहिती स्टेट हाऊसिंग इन्फार्मेशन पोर्टलमध्ये अद्ययावत करून याचा वापर नवीन गृहनिर्माण करणेकामी केला जाईल.

विशेष घटकांकरिता गृहनिर्माणः शासकीय कर्मचारी, माजी सैनिक, स्वातंत्र्य सेनानी, दिव्यांग, पत्रकार, कलाकार, गिरणी व माथाडी कामगार, तसेच विमानतळ कर्मचारी यांसारख्या विशेष घटकांसाठी गृहनिर्माण योजना राबविणे प्रस्तावित आहे. तसेच मुंबईसारख्या शहरांतील प्रमुख रुग्णालयांच्या जवळ रुग्णांच्या नातेवाईकांसाठी भाडे तत्त्वावर परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याकरिता गृहनिर्माण करण्यात येणार आहे. तसेच या सर्व योजना प्रधानमंत्री आवास योजनेच्या (शहरी) तत्त्वावर राबविण्यात येणार आ-हेत. मा. पंतप्रधान यांच्या वॉक टू वर्क या संकल्पनेच्या अनुषंगाने या धोरणात रोजगार केंद्रांच्याजवळ, विशेषतः औद्योगिक क्षेत्रांतील घरांच्या विकासावर भर देण्यात आला आहे. औद्योगिक वसाहत क्षेत्रा-तील सुविधा भूखंडाकरिता आरक्षित असणाऱ्या २०% जागेपैकी १० ते ३० टक्के जागा केवळ निवासी वापरासाठी राखीव ठेवण्याचे प्रस्तावित.

सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांमध्ये समावेशक घरे योजना : वाढत्या शहरी भागात यूडीसीपीआरचे नियम ३.८.२ आणि डीसीपीआरचे नियम १५ अंतर्गत समावेशक घरे योजना केवळ १० लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या मोठ्या महानगरपालिकासह सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांना लागू करण्याचे प्रस्तावित आहे. सदर माहिती म हाआवास मोबाईल पद्वारे अद्ययावत करून उपलब्ध करून देण्यात येणार. तसेच ही माहिती गृहनिर्माण विभागाच्या पोर्टलवर नियमितपणे प्रकाशित करण्यात येईल.

राज्यस्तरीय सर्वोच्च तक्रार निवारण समिती : डीसीपीआर २०३४ च्या विनियम ३३(५), ३३(७), ३३(९) इत्यादी तसेच म्हाडा अधिनियम १९७६ च्या कलम ७९(अ) इत्यादीच्या अंतर्गत पुनर्विकास संदर्भात राज्यस्तरीय तक्रार निवारण यंत्रणा अस्तित्वात नव्हती. याकरिता गुणवत्ता नियंत्रणावर देखरेख ठेवणे, लाभार्थ्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने विकासकांसमवेत मध्यस्थी करणे आणि पुनर्विकास प्रकल्प वेळेत पूर्ण करणे सुनिश्चित करण्यासाठी राज्यस्तरीय सर्वोच्च तक्रार निवारण समिती निर्माण करण्यात येत आहे.

स्वयंपुनर्विकास कक्षः सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारतींचा स्वयंपुनर्विकासाच्या प्रक्रियेस प्रोत्स-ाहन व चालना देण्यासाठी राज्यस्तरावर स्वयंपुनर्विकास कक्ष निर्माण करण्यात येणार आहे. तसेच स्वयंपुनर्विकासाकरिता रु.२००० कोटी इतक्या रकमेचा स्वयंपुनर्विकास निधीची स्थापना करण्यात येणार आहे महाआवास निधीः नीति आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यात गृहनिर्माणाच्या प्रक्रियेस चालना देण्यासाठी राज्यस्तरावर रु.२०,००० कोटी इतका महाआवास निधी स्थापित करण्यात येत आहे. या निधीद्वारे महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना अर्थसहाय्य दिले जाणार. परवडणारी भाडेतत्त्वावरील घरेः भाडेतत्त्वावरील परवडणारी घरे मोठ्या प्रमाणात उपलब्ध करण्यात येणार आहेत. याकरिता म्हाडा, सिडको इ. शासकीय / निमशासकीय संस्था तसेच खाजगी विकसनाद्वारे सदर उद्दिष्टे साधण्यात येणार आहे.

हरित इमारत उपक्रम (ग्रीन बिल्डिंग): नवीन गृहनिर्माण धोरण हरित इमारतींना प्रोत्साहन देते. पर्यावरणपूरक आराखडा तयार करणे, इमारती बांधण्यास उष्णता-प्रतिरोधक सामग्रीचा वापर आणि ऊर्जा-कार्यक्षम बांधकाम तंत्रांचा समावेश आहे. उष्णतेची दाहकता कमी करण्यासाठी आणि हवामान परिवर्तनास प्रतिरोध करण्यासाठी परिसर विकास, छतावरील बागा आणि पर्यावरणपूरक पायाभूत सुविधांच्या एकत्रीकरणास प्रोत्साहित करून शहरांमध्ये जास्तीत जास्त वृक्ष लागवडीवर भर दिला आहे. आपत्तीरोधक इमारतीः शाश्वत, आपत्ती-रोधक, किफायतशीर आणि हवामान योग्य बांधकाम पद्धती मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ग्लोबल हाऊसिंग टेक्नॉलॉजी चॅलेंज अंतर्गत नाविन्यपूर्ण बांधकाम तंत्रज्ञानासह उष्णता, पूर आणि भूकंपासह हवामानाच्या जोखमींचा सामना करण्यासाठी नवीन बांधकामांची योजना आखण्यात येणार. बांधकाम तंत्रज्ञान संशोधन केंद्र स्थापन करणार : आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, हरित इमारत, आपत्ती रोधक तंत्रज्ञान, समावेशकता, परवडणारे गृहनिर्मिती याकरिता बांधकाम तंत्रज्ञान संशोधन केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. पुनर्विकास धोरणेः पुनर्विकास प्रकल्पांम ध्ये सदनिकाधारकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी तसेच पुनर्वसन प्रक्रियेत अडथळा निर्माण होऊ नये याकरिता सोसायटी, विकासक आणि संबंधित नियोजन प्राधिकरण / शासकीय- निम शासकीय भूमालक संस्था यांच्यात त्रिपक्षीय करार करणे, रहिवाशांच्या संरक्षणासाठी आगाऊ भाडे एस्क्रो अकाउंटमध्ये भरणे विकासकास बंधनकारक करण्यात येणार आहे. मुंबई उपनगरांमध्ये पुनर्विकासास चालना देण्याकरिता उपकरप्राप्त इमारतींना लागू असलेले म्हाडा अधिनियमाच्या कलम ७९(अ) व ९१(अ) कलम उपकरप्राप्त नसलेल्या इमारतींना लागू करण्याकरिता म्हाडा स्तरावर अभ्यास करुन सर्वकष प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. मुंबईबाहेरील पुनर्वसन प्रक्रियेला गती मि ळावी याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ तसेच इतर अधिनियमांमध्ये आवश्यक बदल करण्यात येणार आहे.

सामाजिक गृहनिर्माणासाठी झोपडपट्टी पुनर्वसनासाठी निधी: सामाजिक उत्तरदायित्व निधी किफायतशीर आणि सामाजिक गृहनिर्माण प्रकल्पांना (नोकरदार महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी गृहनिम ाण) वापरला जाईल. याकरिता आवश्यक कार्यप्रणाली निश्चित करून प्रक्रियेस प्रोत्साहन देण्यात येईल.

नॉलेज पार्टनर म्हणून नियुक्तीः धोरणात्मक चौकट अधिक बळकट, समावेशक व विस्तृत करण्यासाठी तसेच बदलत्या आर्थिक, सामाजिक व हवाम ानविषयक आव्हानांना तोंड देण्यासाठी आयआयटी, आयआयएम, यूडीआरआय, डब्ल्यूआरआय यांसारख्या संस्थांची नॉलेज पार्टनर म्हणून नियुक्ती करण्यात येणार आहे. झोपडपट्टी पुनर्वसनासाठी केंद्र सरकारच्या जमिनीचा वापरः या धोरणात झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांसाठी केंद्र सरकारच्या जमिनीचा वापर प्रस्तावित आहे. याअंतर्गत केंद्र सरकार व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्यात संयुक्त उपक्रम स्वरूपात झोपडपट्ट्यांच्या पुनर्वसनासाठीच्या योजना राबविता येऊ शकतात. तसेच संबंधित केंद्र सरकारच्या विभागाकडून निधी उपलब्ध करण्याचे प्रस्तावित आहे. झोपडपट्टी पुनर्वसनासाठी प्रकल्पांसाठी खढ-आधारित पध्दतीः झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण प्रकल्पांम ध्ये पारदर्शकता, रिअल-टाइम मॉनिटरिंग आणि उत्तरदायित्व वाढविण्यासाठी या धोरणात खढ-आधारित पध्दतीच्या वा-परास प्रोत्साहन देण्यात येत आहे. ही डिजिटल साधने लाभार्थी निश्चिती, प्रकल्प स्थिती अद्ययावत करणे आणि निधी व्यवस्थापन यासारख्या प्रक्रिया सुलभ करतील. यामुळे अंमलबजावणी कार्यक्षम होईल.

झोपडपट्ट्यांसाठीसमूहपुनर्विकासाला प्रोत्साहनः एकात्मिक नियोजनाच्या माध्यमातून एकाच प्रभागातील अनेक झोपडपट्ट्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी धोरणात्मक दृष्टिकोन म्हणून समूह पुनर्विकासाला या धोरणात प्रोत्साहन देण्यात आले आहे.

झोपडपट्टी पुनर्वसनासाठी सामाजिक उत्तरदायित्व निधीचा वापरः या धोरणात सामाजिक उत्तरदायित्व निधीचा (उडठ) वापर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांसाठी करण्याचा प्रस्ताव आहे. यामुळे घरांच्या निर्मितीच्या आव्हानांचा सामना करण्यासाठी खाजगी क्षेत्राच्या सहभागास प्रोत्साहित केले जाईल. या तरतुदीचा उद्देश अतिरिक्त आर्थिक निधी उभा करणे आणि राहणीमान सुधारण्यासाठी शासन आणि विकासक यांच्यात सहकार्यात्मक प्रयत्नांना चालना देणे आहे.

विकास कराराची नोंदणी बंधनकारकः झोपडीधारक व विकासक यांच्यातील करारनामे मुद्रांक शुल्क पेपरवर तयार करुन किमान मुद्रांक शुल्कावर नोंदणी करण्यात येणार आहे. त्यामुळे झोपडपट्टीधारकांचे कायदेशीर अधिकार संरक्षित होतील.

पुनर्वसन क्षेत्रात सामायिक भागांचा समावेशः पुनर्वसन इमारतीतील पार्किंग, जीना, लिफ्ट आणि लिफ्ट लॉबी हे घटक पुनर्वसन क्षेत्रामध्ये अंतर्भूत करून विकासकांना प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक देण्याबाबत नगरविकास विभागाने पुढील कार्यवाही करेल.

धोकादायक इमारतींचा पुनर्विकासः सध्या धोकादायक स्थितीत असलेल्या पुनर्वसन इमारतींचा ३३(७)अ च्या धर्तीवर प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्रासह पुनर्विकास करण्याचा निर्णयास प्रोत्साहन दिले जाणार.

रखडलेल्या योजनांसाठी नवीन विकासकांची निवडः वारंवार बैठकीनंतरही प्रगती न झालेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांमध्ये नवीन सक्षम विकासकांची निवड निविदा प्रक्रियेद्वारे केली जाणार.

संयुक्त भागीदारीद्वारे योजनाः मुंबई महानगर प्रदेशातील २२८ रखडलेल्या योजनांपैकी बृहन्मुंबई महानगरपालिका, म्हाडा, सिडको, एमएमआरडीए, म हाहाऊसिंग, एमआयडीसी, एसपीपीएल आदी संस्थांच्या संयुक्त भागीदारीतून योजना राबवण्यास शासनाची मान्यता देण्यात आली आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# सिद्धेश्वर तलावाच्या पाण्याची गुणवत्ता वाढवण्यासाठी कृती आराखडा सादर करावा : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

## सार्वजनिक बांधकाम विभागाने इरिएशन ट्रीटमेंटच्या माध्यमातून पाण्याची शुद्धता करण्याचा प्रस्ताव करून १५ जून पर्यंत कार्यारंभ आदेश द्यावेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तलावातील पाण्याचा पीएच कमी झाल्याने ऑक्सिजनचा पुरवठा कमी होऊन मासे व कासव यांचा मृत्यू झाल्याचे प्राथमिक माहिती

सोलापूर (जिमाका):- मागील दहा-पंधरा दिवसात सिद्धेश्वर तलावातील मासे व कासव यांचा काही कारणामुळे मृत्यू होत असल्याची बाब निर्देशनास आली. तलावातील पाण्याचा पीएच कमी झाल्याने पाण्यातील जीवांना ऑक्सिजनचा पुरवठा कमी झाल्याने त्यांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. तरी तलावातील पाण्याची शुद्धता व गुणवत्ता वाढवण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने एका एजन्सीची नियुक्ती करून कृती आराखडा सादर करावा व ते काम सुरू करण्याचे आदेश १५ जून २०२५ पर्यंत द्यावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात सिद्धेश्वर तलावातील मासे व कासव यांच्या मृत्यूच्या कारणाच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद बोलत होते. यावेळी सोलापूर महापालिकेचे आयुक्त सचिन ओंबासे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, रवी पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे, नगर अभियंता सारिका अंकुलवार, सार्वजनिक अभियंता वेंकटेश चोबे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की सार्वजनिक बांधकाम विभागाने पर्यटन विकास अंतर्गत सिद्धेश्वर तलावातील पाण्याची शुद्धता वाढवण्यासाठी एका खाजगी एजन्सीची नियुक्ती करावी. इरिएशन ट्रीटमेंट च्या माध्यमातून पाण्याची शुद्धता करून ऑक्सिजनचे प्रमाण वाढवावे ज्यामुळे मासे कासव व अन्य जलजीवांना धोका निर्माण होणार नाही. त्यासाठी एक कृती आराखडा सादर करून १५ जून २०२५ पर्यंत त्याचे काम सुरू होईल याची खात्री करावी असेही त्यांनी सुचित केले. प्रारंभी या बैठकीत मागील काही दिवसापासून शुद्धेश्वर तलावातील मासे व कासव मृत्यू होत असल्याची घटना निर्देशनास आली होती. त्यांच्या मृत्यूचे कारणांची चर्चा होऊन पाण्याची अमलता वाढल्याने मासे व कासवांना ऑक्सिजनचा पुरवठा कमी झाला व त्यामुळे त्यांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती बैठकीत देण्यात आली.

## थोडक्यात...

### बस मध्ये चढताना महिलेजवळील दागिने लंपास

सोलापूर (प्रतिनिधी) सोलापूर ते हैदराबाद येथे जाणाऱ्या बस मध्ये चढत असताना अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन फिर्यादी अशा ज्ञानेश्वर जाजनुरे (वय-४०,मु.पोस्ट अणदूर, तालुका तुळजापूर) यांच्या जवळील १८ हजार रुपये किमतीचे दागिने चोरून नेल्याची घटना १४ मे रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास सोलापूर एसटी स्टँड येथे घडली.याप्रकरणी अशा जाजनुरे यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदर कटारे हे करीत आहेत.

### नवीन जकात नाका येथे अपघात

सोलापूर (प्रतिनिधी) नवीन जकात नाका येथे अपघात प्रकरणी एका जनाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना १६ मे रोजी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी विश्वनाथ बाळू पाटील (वय-२८,रा.मु.पोस्ट केगाव) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून त्यांच्या फिर्यादीवरून ग्रे रंगाच्या इनोव्हा कार क्रमांक एम.एच.२४.एएफ.३९२६ यातील चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी यांचा चुलत भाऊ हा त्याच्या ताब्यातील बुलेट क्रमांक एमएच.१३.डीसी.१२१० यावरून नवीन जकात नाकाकडून सर्विस रोडने केगावकडे येत असताना नवीन जकात नाका येथे ग्रे रंगाच्या वरील क्रमांकाच्या इनोवा कार चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगात चालवून फिर्यादी यांचा चुलत भाऊ विनोद रमेश पाटील यांच्या बुलेटला पाठीमागून जोरात धडक दिली.त्यानंतर त्याच्या डोक्याला आणि चेहऱ्याला व हाताला गंभीर दुखापत करून अपघातानंतर न थांबता तसाच निघून गेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास पोलीस हवालदार घुगे हे करीत आहेत.

# मोरे निफाड महाविद्यालय निफाड आयोजित 'उत्कृष्ठ वाचक पुरस्कार-२०२५' वितरण सोहळा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

कोणत्याही संकटांना, समस्यांना धैर्याने सामोरे जाण्याचे बळ पुस्तकेच आपल्याला देत असतात. आधुनिक काळामध्ये विविध मनोरंजनाची साधने उपलब्ध झाल्या कारणाने वाचनाकडे दुर्लक्ष होत चालले आहे. तंत्रज्ञानाच्या आधीन न होता प्रत्येकाने नियमित वाचन करण्याची गरज आहे. माणूस म्हणून जगतांना विवेक भावना जपता आली पाहिजे. छोटे छोटे परंतु चांगले विचार आत्मसात करता आले पाहिजेत आणि या गोष्टी वाचनातूनच शक्य होऊ शकतात. असे मत मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांनी व्यक्त केले. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे निफाड येथील मोरे महाविद्यालय येथे आयोजित 'उत्कृष्ठ वाचक पुरस्कार-२०२५' वितरण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे, समिती अध्यक्ष डॉ. उत्तम डेर्ले, अशोक वडघुले, जानकीराम धारराव, सुधाकर कापसे, डॉ. प्रवीण ढेपले, प्रा. अभय वडघुले, . आदी मान्यवर उपस्थित होते. ....

प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे म्हणाले की, महाविद्यालयात वाचनसंस्कृतीची परंपरा वृद्धिंगत व्हावी, वाढावी यासाठी महाविद्यालयात विविध उपक्रम राबविले जातात. उत्कृष्ठ वाचक पुरस्कार देण्यातून विद्यार्थी,सहकारी यांना अधिक वाचन करण्यास प्रेरणा मिळून वाचन सवय विकसित व्हावी हा उद्देश्य असल्याचे म्हटले. उत्कृष्ट वाचक पुरस्कार कु. धनश्री वाघचौरे, कु. सूरज भोसले या विद्यार्थ्यांना प्राप्त झाला तर वरिष्ठ विभाग प्रा.नरेश सोनटक्के, कनिष्ठ विभाग श्रीमती प्रतिभा वाटपाडे, वरिष्ठ लिपिक रघुनाथ रायते, शिपाई समाधान फडताळे, या सेवकांना उत्कृष्ठ वाचक पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन डॉ. महेश बनकर यांनी केले तर आभार प्रा. चेतन कुंदे यांनी मानले.

# श्री पांडुरंगाच्या पालखी सोहळ्याचे मुक्ताईनगरला प्रस्थान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : प्रति वर्षाप्रमाणे श्री पांडुरंगाच्या पालखी सोहळ्याचे दिनांक २० मे रोजी सहा वाजता टाळ मृदंगाच्या गजर आणि विठ्ठल नामाचा जयघोष करत श्री संत मुक्ताबाईंच्या अंतर्धान समाधी सोहळ्यासाठी प्रस्थान झाल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती पंढरपूर तसेच श्री संत मुक्ताई संस्थान, मुक्ताईनगर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रतिवर्षीप्रमाणे श्री संत मुक्ताई अंतर्धान सोहळ्यानिमित्त श्री पांडुरंगाच्या पादुकाचे प्रस्थान झाले. मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोजशोत्री यांच्या हस्ते पादुकाचे विद्युत पूजन करण्यात आले यावेळी मुक्ताईनगरचे ह .भ. प रवींद्र महाराज हरणे व इतर पदाधिकारी तसेच मंदिर समितीचे विभाग प्रमुख पांडुरंग बुरांडे सहाय्यक विभाग प्रमुख तथा पुजारी संदीप कुलकर्णी व प्रसाद दशपुत उपस्थित होते

या पालखी सोहळ्यांमध्ये पूजा अर्चा करण्यासाठी व सुरक्षतेसाठी कर्मचारी सोबत पाठवण्यात आले आहेत. हा पालखी सोहळा वाहनातून जाणार आहे पालखी सोहळ्यांचा करमाळा, अहिल्यानगर छत्रपती संभाजी नगर मुक्ताईनगर असा मार्ग आहे आज पालखीचा मुक्काम छत्रपती संभाजी नगर या ठिकाणी होणार आहे.

# महाराष्ट्र स्वराज्य पक्षाच्या मुंबई विभाग युवक अध्यक्षपदी संतोष कदम यांची नियुक्ती



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : छत्रपती संभाजी राजे यांच्या महाराष्ट्र स्वराज्य पक्षाच्या मुंबई विभाग युवक अध्यक्षपदी संतोष कदम यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्याकडे मुंबई, रायगड, ठाणे व पालघर जिल्ह्यातील संघटनात्मक जबाबदारी सोपवण्यात आली आहे. पक्षाचे उपाध्यक्ष अंकुश बाबा कदम, सरचिटणीस धनंजय जाधव यांच्या स्वाक्षरीने पक्षाच्या मुंबई विभाग युवक अध्यक्षपदी संतोष कदम यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# शालेय विद्यार्थ्यांच्या दाखले वाटपसाठी तालुक्यात विशेष शिबीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दहावी व बारावी शालांत परीक्षेचे निकाल लागले असून, विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षासाठी आवश्यक असलेले दाखले सुलभ व सहज उपलब्ध व्हावेत तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक गरजांची पुर्तता व्हावी व विद्यार्थ्यांना आपले दाखले स्थानिक स्थरावर मिळावे या उद्देशाने तहसिल कार्यालय, पंढरपूर यांच्या मार्फत पंढरपूर तालुक्यात मंडळ स्थरावर श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानातंर्गत विशेष शिबीर आयोजित करण्यात आल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवेशासाठी आवश्यक आवश्यक दाखले (उदा. उत्पन्न, वय व अधिवास, जातीचा दाखला, नॉन क्रिमीलेयर दाखला व इतर दाखले तसेच नागरिकांना रहिवाशी, उत्पन्न व जातीचे दाखले देण्यासाठी तालुक्यात दि. २३ मे २०२५ रोजी करकंब, खर्डी, चळे व भंडीशेगांव व दि. २७ मे २०२५ रोजी पंढरपूर, तुंगत व कासेगांव तसेच दि. ३० मे २०२५ रोजी रोपळे,पुळूज, पटवर्धन कुरोली, भाळवणी या महसूल मंडळाच्या ठिकाणी मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांच्या कार्यालयात विशेष शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

सदर शिबीरासाठी मंडळ निहाय महा ई सेवा केंद्र चालक यांची नेमूणक करण्यात आली असून, मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांनी शालेय विदयार्थी व नागरिकांनी गांव निहाय महा ई सेवा केंद्र चालक यांचेशी समन्वय साधून, शिबीर आयोजित करुन सदर शिबीरामध्ये जास्तीत संख्येने दाखले देण्याचे कामकाज करावे तसेच जास्तीत संख्येने उपस्थित राहून दाखले प्राप्त करुन घ्यावेत.असे आवाहन तहसिलदार लंगुटे यांनी केले आहे.

# डॉ. शितल मनोजकुमार माने पवार आंतरराष्ट्रीय हिंदी भाषा वाचस्पती पुरस्काराने सन्मानित



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/प्रतिनिधी : गोवा हिंदी अकादमीच्या वतीने आंतरराष्ट्रीय हिंदी शिक्षक व साहित्यकार संमेलन थायलंडच्या बँकॉक शहरात संपन्न झाले. कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या हिंदी विषयाच्या विभागप्रमुख डॉ. शितल मनोजकुमार माने पवार यांना आंतरराष्ट्रीय हिंदी भाषा वाचस्पती पुरस्काराने यावेळी सन्मानित करण्यात आले.

डॉ. शितल माने पवार यांना जागतिक दर्जाच्या हिंदी भाषा विकास, संवर्धन, संशोधनाच्या आंतरराष्ट्रीय कार्यात दिलेल्या योगदानाबद्दल थायलंड मधील भारताच्या दूतावासातील हिंदी विभाग प्रमुख व ग्लोबल इंडिया इंटरनॅशनलच्या प्रमुख शिखा रस्तोगी यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी अजय रस्तोगी, संमेलनाचे स्वागताध्यक्ष उस्मान मुलानी, संमेलनाध्यक्ष कैलास जाधव, प्रमुख अतिथी ड. प्रभाकर औटी, ड. विजय गोरडे, राजेंद्र सातपुते, शांताराम पवार हे मान्यवर उपस्थित होते.

राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष ,माजी मंत्री व इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव ड. मनोहर चौधरी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन सरवदे , उपप्राचार्य दत्तात्रय गोळे, डॉ. शिवाजी वीर, डॉ. भीमाजी भोर यांनी डॉ. शीतल माने - पवार यांचे अभिनंदन केले.

**नवनियुक्त पोलीस अधीक्षक संदीप सिंग गिल काय कारवाई करणार याकडे जनतेचे लक्ष**

# इंदापूर शहरासह परिसरात अवैध धंद्यांचा उघडपणे धुमाकूळ; पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी : अतुल सोनकांबळे

इंदापूर शहरासह तालुक्यात बेकायदा मटका, गुटखा ,जुगार, दारू, गुटखा, सावकारीसह अवैध धंद्यांना मोठ्या प्रमाणात ऊत आला असून या अवैध धंद्याकडे पोलीसांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष असल्याने हे धंदे राजरोसपणे सुरू असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे. शहरात पोलिस ठाणे असून अडचण नसून खोळंबा असेच असल्याची चर्चा आहे .पोलिसांच्या दुर्लक्षामुळे अवैध व्यवसाय तेजीत असल्याचे चित्र आहे. अवैध दारूविक्री सट्टा, जुगार आदी फोफावल्याने सामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत.




पुणे ग्रामीण चे नवनियुक्त पोलीस अधीक्षक संदीप सिंग गिल इंदापूर तालुक्याकडे लक्ष देऊन कठोर कारवाई करतील का ?हेच पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. मटका व जुगार अड्डा यासह आदी चालणा-या अवैद्य धंद्यांवर पोलिसांचा अंकुश नसल्याने इंदापूर शहरासह तालुक्यात मोठ्या प्रमाणात अवैध धंदे खुलेआम सुरू आहेत मात्र पोलिस बघ्याची भूमिका घेत असल्याची नागरिकात जोरदार चर्चा सुरू आहे

दारू, मटका , गुटखा , वाळू हे अवैध धंदे कुणाच्या आशीर्वादाने सुरू आहेत याची चर्चा सुरू आहे. गल्लीबोळात सुरू असलेले जुगाराचे अड्डे, हॉटेल व ढाब्यावर सहज मिळणारी दारू यामुळे तरूण पिढी व्यसनाच्या आहारी गेल्याचे चित्र दिसून येत आहे.

**पोलिस व अवैध धंदेवाल्यांनचें लागेबांधे**

याकडे पोलिसांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष होत असल्याने अवैध धंदे तेजीत असल्याचे चित्र आहे. तर महिण्याकाठी लाखो रुपयांची काळी माया गोळा केली जात असल्यानेच अवैध धंदे जोमात सुरू असून शहरात रविवारच्या आठवडी बाजारात भुरट्या चोरांची संख्या वाढली आहे. इंदापूर पुणे सोलापूर हायवेवर धाब्यावर व टपरीवर खुलेआम दिवसाढवळ्या दारु विक्री चालू आहे

तसेच शहरातून वाळूची चोरटी वाहतूक केली जात असल्याची ही जनतेत चर्चा आहे. या वाळूच्या धंद्यातून मोठी कमाई केली जात असल्याचे बोलले जात आहे .

# अक्कलकोट रोड एमआयडीसीत आगीच्या दुर्घटना होऊ नयेत यासाठी उप समिती गठित करावी : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

## एमआयडीसी परिसरातील वीज वितरणाची त्रयस्थ संस्थेकडून तपासणी करणार; अधिकाऱ्यांना दिले निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : अक्कलकोट रोड एमआयडीसी येथे दिनांक १८ मे २०२५ रोजी पहाटे एका टॉवेल कारखान्याला आग लागून त्यात आठ नागरिकांचा मृत्यू झाला. ही अत्यंत दुर्दैवी घटना होती. तसेच यापूर्वीही एमआयडीसीमध्ये आगीच्या घटना झालेल्या असून अशा दुर्घटना होऊ नयेत यासाठी एक उपसमिती गठित करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

अक्कलकोट रोड एमआयडीसी येथे झालेल्या टॉवेल कारखान्याच्या आग दुर्घटनेबाबत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज महापालिका प्रशासन, विद्युत वितरण कंपनी, अग्निशामक दल, आपत्ती व्यवस्थापन तसेच विविध विभाग व यंत्रमाग संघ यांची जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आढावा बैठक घेतली. त्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी सोलापूर महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, एमआयडीसीचे विभागीय अधिकारी शिवाजी राठोड, अतिरिक्त महापालिका आयुक्त रवी पवार तसेच संदीप कारंजे, अधीक्षक अभियंता महावितरण सुनील माने, उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदुणे, तहसीलदार निलेश पाटील व सोलापूर यंत्रमाग संघाचे पदाधिकारी तसेच अग्निशमन दलाचे अधिकारी व सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, अक्कलकोट रोड एम आयडीसी मध्ये वारंवार घडणाऱ्या आगीच्या घटनांमुळे जीवित व वित्तीय हानी होत आहे. त्यामुळे सर्व संबंधित विभागाच्या विभाग प्रमुख तसेच सोलापूर यंत्रमाग संघाचे प्रतिनिधी यांची सर्व समावेशक अशी




एक उपसमिती एमआयडीसी ने गठीत करावी. एमआयडीसीच्या सुरक्षेच्या दृष्टीने या समितीने सर्वसमावेशक विचार करून एक कृती आराखडा तयार करावा व पुढील महिन्यात प्रशासनाला सादर करावा, असेही त्यांनी सूचित केले.

अग्निशामन दलाच्या बंबांना पाणी भरण्यासाठी एमआयडीसी परिसरातच वॉटर फिडर पॉईंट निर्माण करण्याबाबत जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सूचित केले. यावेळी त्यांनी आग लागलेल्या कारखान्याच्या प्रथम दर्शी कर्मचारी यांच्याकडून आगीचे कारण समजून घेतले. तसेच आग विझवण्यासाठी आलेल्या अडचणींची ही माहिती त्यांनी घेतली. त्यावेळी त्यांनी एमआयडीसीचे अधिकारी, अग्निशमन दलाचे अधिकारी, महसूलचे अधिकारी व पोलीस प्रशासन यांच्याकडून आगीची कारणे तसेच ती विजवण्यासाठी केलेल्या उपाययोजनांची सविस्तर माहिती घेतली. तसेच एमआयडीसीमध्ये वीज वितरण कंपनीची डीपी फिडर, लाईन याविषयी वीज वितरण कंपनीच्या वीज निरीक्षक यांनी सविस्तर माहिती घेऊन अहवाल सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

एमआयडीसी परिसरातील वीज वितरण कंपनीची वितरण व्यवस्था याबाबत त्रयस्थ संस्थेकडून तपासणी करून घेण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली.

अक्कलकोट एमआयडीसी रोड परिसरात टॉवेल कारखान्याला लागलेल्या आगीबाबत महापालिका आयुक्त सचिन ओंबासे यांनी एम आयडीसी परिसरातील बांधकामे, रस्ते तसेच वीज वितरण व्यवस्थेच्या अनुषंगाने माहिती बैठकीत दिली. तसेच एमआयडीसी कारखाण्यात निवासस्थान नसावीत असेही त्यांनी सांगितले.

उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदुने यांनी सेंट्रल टेक्सटाईल कारखान्याला लागलेली आग ही शॉर्टसर्किटमुळे लागली असावी असा अंदाज वर्तवून त्या ठिकाणी आग विझवण्यासाठी अग्निशामक दलाचे बंब त्वरित उपस्थित होते, परंतु आग अग्निशामन दलाचे वाहन त्या ठिकाणी जाण्यासाठी रस्ता नव्हता, त्यामुळे आग वाढत गेली. शेवटी जेसीबी मागून इमारतीची भिंत पाडण्यात आली, व त्यानंतरच बचाव कार्याला व आग नियंत्रणात आणण्यासाठी गती मिळाली असे त्यांनी सांगितले.

यंत्रमाग धारकांच्या प्रतिनिधीच्या म्हणण्यानुसार एमआयडीसी परिसरात आगीच्या घटना वारंवार घडण्यामागे वीज वितरण कंपनीने कमी/अधिक दाबाने वीज पुरवठा करणे हे असल्याचे सांगितले. वीज वितरण कंपनीने एमआयडीसी परिसरात उद्योजकांना आवश्यक दाबाने वीज पुरवठा नियमितपणे केल्यास शॉर्टसर्किटमुळे आग लागण्याच्या घटना घडणार नाहीत, असेही त्यांनी सांगितले.

## थोडक्यात...

### मारहाणीबाबत विचारणा केल्यावर दगडाने मारहाण ; चौघांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) मारहाणीबाबत विचारणा केल्यानंतर पुन्हा दगडाने मारून जखमी केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना १९ मे रोजी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास संतोष नगर येथे घडली.याप्रकरणी महादेवी कृष्णात बंदीछोडे (वय-३६,रा.संतोष नगर,बाळे) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून ऋषिकेश मोहिते,आशा म




ोहिते,श्रीरंग मोहिते व सोनी मोहिते (सर्व राहणार संतोष नगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी व फिर्यादी यांचे पती तीन दिवसापूर्वी ऋषिकेश मोहिते यांनी फिर्यादीस केलेल्या मारहाणी बाबत फिर्यादी व फिर्यादीचे पती असे दोघे त्यांच्या घरी जाऊन फिर्यादीच्या पतीने फिर्यादीच्या पत्नीला का मारले असे विचारले असता,तेव्हा त्याने तुमची पत्नी नेहमी वाटेत बादली व बॅरेल ठेवते.तिला समजावून सांगा,नाहीतर भांडण होईल असे म्हणाले.त्यावेळी फिर्यादीच्या पतीने सदरची जागा हे दोघांना जाण्याकरिता आहे.असे म्हणून शिवीगाळ करून मारहाण केली.त्यावेळी आशा मोहिते हिने फिर्यादी यांच्या डोक्याचे केस पकडून खाली पाडले.तसेच ऋषिकेश मोहिते याने दगड घेऊन फिर्यादी यांच्या कपाळावर मारून फिर्यादींच्या घराची काच व बॅरेल फोडून नुकसान केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोलीस हवालदार घुगे हे करीत आहेत.

# रविवार असूनही शाळेची घंटा वाजली; १७ वर्षानंतर एकत्रित भेटले विद्यार्थी

### सुपतगाव येथील भिमराव लामजणे प्रशालेचा माजी विद्यार्थी व शिक्षक स्नेह मेळावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा /प्रतिनिधी : रविवारी शाळेची घंटा वाजली!विध्यार्थी आले अन प्रार्थनाही भरली. शिक्षकांनी परेड सावधान विश्राम केले आणि राष्ट्रगीत सुरु झाले. उमरगा तालुक्यातील सुपतगाव येथील भिमराव लामजणे प्रशालेतील इयत्ता दहावी वर्गातील सन २००७-०८च्या माजी विधार्थी यांची घटना आहे.

१७ वर्षानंतर एकत्र आलेल्या विधार्थी -विधार्थिनी यांचा हा गेट टुगेदर मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या विद्यार्थ्यांनी पुन्हा शाळेत जाऊन प्रार्थना झाली, वर्गात जाऊन बसून गुरुजींनी पुन्हा शिकवले, मागच्या आठवनीना उजाळा मिळाला.

उमरगा तालुक्यातील सुपतगाव येथील भिमराव लामजणे प्रशाला येथील २००७-०८सालीच्या दहावीतील बॅचच्या विद्यार्थ्यांनी रविवारी दि. १८ रोजी १७वर्षांनी हा स्नेह मेळावा घडवून आणला. हा गेट-टुगेदर सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न झाला.

माजी विद्यार्थ्यांनी गुरुजींना पुष्पांची उधळण करत त्यांना फेटा बांधून शाल -श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सूत्रसंचालन मोहन गुरव यांनी केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी त्यांच्या शालेय जीवनातील व सद्यस्थितील अनुभव व्यक्त केले, तसेच गुरुजींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशालेचे मुख्याध्यापक शिवशरण कारभारी,



या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षक नागनाथ बनसोडे , डी. डी. सूर्यवंशी,शाळेतील सहशिक्षक शेखर सगर, महादेव शिदोरे,नागनाथ कांबळे,श्रीशैल तुप्पे,शाळेतील कर्मचारी उमाकांत बिराजदार, लक्ष्मण हुळमजगे, किसन मडोळे यांची उपस्थिती होती.

तसेच २००८ च्या बॅचमधील नागनाथ हेंडले ,बसवराज जगदाळे, राहूल पाटील, नवनाथ बिराजदार, उमेश सगर,मोहन गुरव, विरभद्र स्वामी, महेश सगर, प्रशांत भालेराव,भाग्यश्री जगदाळे, गीता मुगळे, सविता सलगर, पद्मिनी सुतार, अंबिका करके, नागिणी सुतार,पूजा चौधरी, लक्ष्मी सगट,राजेश्री क्षीरसागर, शुभांगी माने,जगदेवी बडूरे, प्रतिभा परीट यांच्यासह सर्व मुले- मुली, मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# गुणवत्तापूर्ण शिक्षण हीच अचीव्हर्सची ओळख : खा. भास्करराव भगरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

शिवज्ञानदर्शन शिक्षण प्रतिष्ठाण संचलित विस्डम इंटरनॅशनल स्कूल आणि अचीव्हर्स ज्यूनियर कॉलेज निफाड येथे आज इयत्ता १०वी व १२वीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यास दिंडोरी लोकसभा मतदारसंघाचे खासदार मा. भास्कर भगरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजीमहाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले.याप्रसंगी संस्थेच्या वतीने खा.भगरे यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी त्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी आपल्या मनोगतातून शुभेच्छा दिल्या. शिक्षणाच्या माध्यमातून आपण स्वतःचे आयुष्य घडवू शकतो, आणि समाजात नवा आदर्श निर्माण करू शकतो, असे ते म्हणाले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव वैभव लोखंडे यांनी मांडले.

या कार्यक्रमात खा.भगरे यांनी विशेष उल्लेख केला गेला तो अनिकेत या युवकाच्या प्रेरणादायक प्रवासाचा. परीक्षेत तुलनेने कमी गुण मिळूनही अनिकेतने हार न मानता कठोर मेहनतीच्या बळावर एक यशस्वी व्यावसायिक म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली. त्याची कहाणी उपस्थित विद्यार्थ्यांसमोर मांडून, विशेषतः कमी गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना निराश न होता, प्रयत्न सुरू ठेवण्याची प्रेरणा दिली गेली.

खासदार भगरे म्हणाले, गुण हे यशाचे एकमेव मापदंड नाहीत. आत्मविश्वास, चिकाटी आणि मेहनत यांच्या जोरावर कोणतीही शिखरं गाठता येतात.

कार्यक्रमात शिक्षक, पालक आणि अनेक मान्यवर उपस्थित होते. या गौरव सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य आणि पुढील प्रवासासाठी आत्मविश्वास निर्माण झाला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी मा. खा. श्री.भास्करराव भगरे, संस्थेचे अध्यक्ष रोशन लोखंडे, डॉ. जितेंद्र वडघुले, साहेबराव कापसे, अर्जुन वडघुले डॉ. योगेश गोसावी. गणेश महाले. संस्थेचे संपर्क प्रमुख सुहास सुरळीकर प्राचार्य - शरद कटके, उप प्राचार्य भूषण सावंत उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि ॲडमिन टीम सर्वांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुहास सुरळीकर यांनी केले.

**पाणीटंचाईमुळे ग्रामस्थ हैराण**

**ऋषिकेश भोपळेंनी ठेवल्या मागण्या**

# पत्रकार ऋषी भोफळे देऊळगाव घुबे येथील पाणी टंचाईवर आक्रमक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी/ राहुल साबळे

बुलडाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यातील देऊळगाव घुबे गावात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. गावात दोन नळ योजना आणि विहिरी असूनही ग्रामस्थांना रोज पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. या समस्येकडे स्थानिक प्रशासन आणि ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर, गावातील युवक ऋषिकेश गणेश भोपळे यांनी ग्रामपंचायती विरोधात तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. त्यांनी प्रशासनासमोर काही ठोस मागण्या ठेवल्या असून, या मागण्या पूर्ण न झाल्यास गावातील पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

चिखली गावात पाणीटंचाईची समस्या गेल्या काही महिन्यांपासून गंभीर बनली आहे. गावात पाण्याच्या दोन नळ योजना कार्यरत असल्या, तरी त्यांचा पुरवठा अनियमित आहे. विहिरींमधील पाण्याची पातळीही खालावली आहे. परिणामी, ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी लांब पल्ल्याचा प्रवास करावा लागतो. विशेषतः महिला आणि मुलांना याचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे. स्थानिक यंत्रणांनी या समस्येचे निराकरण करण्यासाठी ठोस पावले उचलली नसल्याने ग्रामस्थांमध्ये असंतोष वाढत आहे.

या गंभीर परिस्थितीत गावातील युवक ऋषिकेश गणेश भोपळे यांनी पुढाकार घेत ग्रामपंचायतीविरोधात आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. त्यांनी ग्रामपंचायत आणि स्थानिक प्रशासनाला उद्देशून खालील मागण्या ठेवल्या आहेत:

१. घरकुल योजनेची सखोल चौकशी: घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांच्या निवडीत गैरप्रकार झाल्याचा आरोप आहे. याची निष्पक्ष चौकशी करून पात्र लाभार्थ्यांना न्याय मिळवून द्यावा.

२. ग्रामपंचायतीच्या लेखापरीक्षण अहवालाची माहिती: ग्राम पंचायतीच्या वार्षिक लेखापरीक्षण अहवालाची प्रत ग्रामस्थांना उपलब्ध करून द्यावी, जेणेकरून निधीच्या वापराबाबत पारदर्शकता येईल.

३. १५व्या वित्त आयोगाच्या निधीचा हिशेब: १५व्या वित्त आयोगातून मिळालेल्या निधीचा खर्च आणि त्याच्या वापराची माहिती जाहीर करावी.

४. सिंचन विहिरींच्या वाटपाची चौकशी: सिंचन विहिरींचे वाटप पात्र लाभार्थ्यांना न होता इतरांना झाल्याचा आरोप आहे. याची तातडीने चौकशी करावी.

ऋषिकेश भोपळे यांनी या मागण्यांसाठी प्रशासनाला २९ मे २०२५ पर्यंतची मुदत दिली आहे. या कालावधीत मागण्या पूर्ण न झाल्यास, ते गावातील पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन करतील, असा इशारा त्यांनी दिला आहे.

ग्रामस्थांचा पाठिंबा

ऋषिकेश भोपळे यांच्या या आंदोलनाला गावकऱ्यांचा मोठा पाठिंबा मिळत आहे. गावातील ज्येष्ठ नागरिक, युवक आणि महिलांनीही या मागण्यांना समर्थन दर्शवले आहे. पाणीटंचाईसारख्या मूलभूत समस्येकडे ग्रामपंचायत आणि प्रशासन दुर्लक्ष करत आहे. त्याचबरोबर गावच्या विकासकामांमध्येही पारदर्शकता नाही. ऋषिकेशच्या मागण्या रास्त असून, त्यासाठी आम्ही त्यांच्या सोप्रशासनाची भूमिका काय?

या प्रकरणी स्थानिक प्रशासन आणि ग्रामपंचायतीकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. यापूर्वीही चिखली तालुक्यातील काही गावांमध्ये पाणीटंचाईच्या समस्येवरून टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला होता. मात्र, चिखली गावातील पाणीटंचाईच्या समस्येचे कायमस्वरूपी निराकरण झालेले नाही. आता ऋषिकेश भोपळे यांच्या आंदोलनाच्या इशाऱ्यामुळे प्रशासन काय पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पुढे काय?

पाणीटंचाईआणिग्रामपंचायतीच्या कारभारावरील प्रश्नांनी चिखली गावातील वातावरण तणावपूर्ण बनले आहे. ऋषिकेश भोपळे यांच्या मागण्या आणि आंदोलनाचा इशारा यामुळे स्थानिक प्रशासनावर दबाव वाढला आहे. आगामी काही दिवसांत प्रशासन या मागण्यांवर काय प्रतिसाद देते आणि पाणीटंचाईच्या समस्येचे निराकरण कसे करते, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. ग्रामस्थांनीही या आंदोलनाला



पाठिंबा दर्शवत एकजुटीने आवाज उठवण्याची तयारी दर्शवली आहे